| प्रश्न पुस्तिका क्रमांक | गोंदिया जिल्हा<br>पोलीस शिपाई भरती लेखी परीक्षा<br>सन २०२४-२५ | प्रश्न पुस्तीका संच/सेट<br>**B** |
|---|---|---|

**Chest No : चेस्ट नं-** ______________________________

**चाचणीचा कालावधी : 90 मिनीटे** **प्रश्नांची एकूण संख्या : 100** **एकूण गुण : 100**

## -: उमेदवारासाठी सुचनाः -

**प्रश्नपत्रिकेतील प्रश्न सोडविण्यापुर्वी उमेदवाराने या सुचना काळजीपुर्वक वाचल्या पाहिजेत**

१) ओ. एम. आर वर तुमचा चेस्ट नंबर प्रश्नपुस्तिका क्रमांक व प्रश्नपुस्तिका संच/सेट काळजीपुर्वक लिहावा आणि योग्य ठिकाणी स्वाक्षरी करावी.

२) संपुर्ण चाचणी वस्तुनिष्ठ प्रकारच्या प्रश्नांची असुन त्यात १०० प्रश्न आहेत. सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.

३) प्रत्येक प्रश्नाला १ गुण आहे आणि यात कोणत्याही चुकीच्या उत्तरासाठी निगेटिव्ह मार्किंग नाही. प्रश्न फक्त मराठी भाषेत आहेत.

४) उमेदवारांना प्रश्नामध्ये कोणतीही विसंगती आढळल्यास पर्यवेक्षकाला त्वरीत कळवावे.

५) संबंधीत प्रश्न क्रमांकासाठी ओ.एम.आर उत्तरपत्रिकेत दिलेल्या जागेत विहीत पद्धतीने उत्तरे लिहिण्याची काळजी घ्यावी.

६) उमेदवाराने ओ.एम.आर उत्तरपत्रिकेवर गोल रंगवितांना फक्त काळ्या बॉल पॉईंट पेनचा वापर करावा.


७) कच्चे काम ओ.एम.आर उत्तरपत्रिकेवर न करता प्रश्नपुस्तिकेत दिलेल्या जागेतच करावे.

८) उमेदवाराने चाचणीच्या अखेरीस ओ.एम.आर उत्तरपत्रिका कर्तव्यावर असलेल्या पर्यवेक्षकाला सोपवावी.

९) ओ.एम.आर उत्तरपत्रिकेवर माहीती भरतांना काही चूक झाल्यास सदरची बाब लगेच पर्यवेक्षक यांचे लक्षात आणून द्यावी.

१०) ओ.एम.आर उत्तरपत्रिकेवर सर्व आकडे इंग्रजीत लिहावे.

**प्रश्न क्र.1 )** सोबतच्या आकृतीत किती आयत आहेत ?



अ) 16 ब) 14 क) 15 ड) 13

**प्रश्न क्र.2)** घरातील एका भिंतीवर आरसा व त्याच्या समोरील भिंतीवर घड्याळ बसविले आहे. जर घड्याळात प्रत्यक्ष 3 वाजुन 40 मिनिटे झाली असतील तर घड्याळाची आरशातील प्रतिमा कोणती वेळ दर्शवेल ?

अ) 8.20 ब) 9.20 क) 10.30 ड) 7.40

**प्रश्न क्र.3) विधान : -** १) सर्व कागद, झाडे आहेत.
२) सर्व झाडे, दगड आहेत.

**अनुमान : -** १) सर्व झाडे, कागद आहेत.
२) सर्व कागद, दगड आहेत.

**पर्याय-** अ) फक्त अनुमान 1 बरोबर ब) फक्त अनुमान 2 बरोबर
क) सर्व अनुमान बरोबर ड) सर्व अनुमान चूक

**प्रश्न क्र.4)** राष्ट्रीय विज्ञान दिन सोमवारी आहे, तर त्या वर्षाची सुरुवात कोणत्या वाराने झाली होती ?

अ) गुरूवार ब) रविवार क) शुक्रवार ड) शनिवार

**प्रश्न क्र.5)** पुढील अक्षर गटातील चुकीचे पद ओळखा.

AZ, BY, CX, DV, EV

अ) DV ब) CX क) BY ड) AZ

**प्रश्न क्र.6)** गटात न बसणारा शब्द कोणता आहे ?

अ) भुईमूग ब) सुर्यफूल क) उडीद ड) तिळ

**प्रश्न क्र.7)** एका मैदानात,

१) कुमार हा अंकुरच्या उजवीकडे 40 मीटर अंतरावर आहे.
२) देव हा कुमारच्या दक्षिणेकडे 60 मीटर अंतरावर आहे.
३) निलेश हा अंकुरच्या पश्चिमेकडे 25 मीटर अंतरावर आहे.
४) पिंटु हा देवच्या उत्तरेकडे 90 मीटर अंतरावर आहे.

जर एक मुलगा निलेश कडून अंकुरकडे चालत जातो, नंतर अंकुरकडून कुमारकडे नंतर कुमारकडून देवकडे नंतर देवकडून पिंटुकडे चालत जातो, तर तो एकुण किती अंतर चालतो.

(अ) 215 मीटर (ब)155 मीटर (क) 245 मीटर (ड) 185 मीटर

**प्रश्न क्र.8)** एक व्यक्ती पश्चिमेला तोंड करुन उभी आहे. ती प्रथम घडाळ्याच्या काट्याच्या दिशेने **90°** कोनात वळते. नंतर घडाळ्याच्या काट्याच्या विरुद्ध दिशेने **135°** कोनात वळते. तर तीचे तोंड कोणत्या दिशेला असेल?

(अ) दक्षिण (ब) उत्तर (क) वायव्य (ड) नैऋत्य

**प्रश्न क्र.9 )** 11, 5, 20, 12, 38 ------?, 74, 54

(अ) 42 (ब) 32 (क) 26 (ड) 22

**प्रश्न क्र.10 )** 87, 62, 42, 27, 17 ------?

(अ) 7 (ब) 12 (क) 8 (ड) 10

**प्रश्न क्र.11)** AC, EG, IK ..........?

(अ) MO (ब) LM (क) ON (ड) OP

**प्रश्न क्र.12)** 26 : 5 :: 65 : ?

(अ) 6 (ब) 7


(क) 8 (ड) 9

**प्रश्न क्र.13)** 25 विद्यार्थ्यांच्या एका वर्गात स्नेहाचा शेवटून 19 वा क्रमांक व मीनाचा सुरूवातीपासुन 23 वा क्रमांक आहे. जर छायाचा क्रमांक स्नेहा व मीना यांच्या बरोबर मध्ये असेल, तर छायाचा शेवटून क्रमांक किती?

(अ) 15 वा (ब) 12वा

(क) 14 वा (ड) 11 वा

**प्रश्न क्र.14)** दिलेल्या उदाहरणात पहिल्या दोन मांडण्यांचा/ गणिती क्रियांचा अभ्यास करुन प्रश्नचिन्हाच्या जागी काय येईल ते निवडा.





(अ) 64 (ब) 65 (क) 66 (ड) 63

**प्रश्न क्र.15)** एक स्त्री राकेशची ओळख करुन देतांना स्वतःच्या पतीला म्हणाली, ''याच्या सख्या भावाचे वडील माझ्या वडिलाकडच्या आजोबाचा एकुलता एक मुलगा आहे.'' तर त्या स्त्रीचे राकेशशी नाते काय ?

(अ) आत्या (ब) आई (क) बहीण (ड) मुलगी

**प्रश्न क्र.16)** भारत, नेपाळ, श्रीलंका यांच्यातील परस्पर संबंध दर्शविणारी आकृती कोणती?

(अ) (ब) (क) (ड)



**प्रश्न क्र.17)** खालील आकृतीत * च्या ठिकाणी येणारा योग्य अंक शोधा.

| 80 | |
|---|---|
| 8 | 5 |

| 42 | |
|---|---|
| 7 | 3 |

| * | |
|---|---|
| 9 | 6 |

(अ) 101 (ब) 88

(क) 108 (ड) 112

**प्रश्न क्र.18)** आशिषचे वजन गोविंद पेक्षा अधिक आहे. मोहीतचे वजन जॅक पेक्षा कमी आहे. पवनचे वजन जॅक पेक्षा अधिक व गोविंद पेक्षा कमी आहे. तर सर्वात जास्त वजन कोणाचे आहे?

(अ) गोविंद (ब) जॅक (क) पवन (ड) आशिष

**प्रश्न क्र.19)** एका पुरुषाकडे बोट दाखवुन मनिषा म्हणाली, " तो माझ्या सासऱ्याचा एकुलता एक मुलाचा लहान मुलगा आहे." तर मनिषाचे त्या लहान मुलाच्या वडिलांशी नाते काय?

(अ) आई (ब) बहिण (क) पत्नी (ड) यापैकी नाही.

**प्रश्न क्र.20)** एका सांकेतीक भाषेत

| गमन | मरण | गजर | नरम |
|---|---|---|---|
| 426 | 235 | 413 | 632 |

तर नजर हा शब्द कसा लिहावा लागेल?

(अ) 613 (ब) 631 (क) 653 (ड) 615

**प्रश्न क्र.21)** मन्वंतर या जोड शब्दाची संधी सोडवा.

(अ) मनः + अंतर (ब) मन्व + अंतर (क) मनु + अंतर (ड) मन + अंतर

**प्रश्न क्र.22)** 'देवालय' हा शब्द कोणत्या संधीचे उदाहरण आहे?

(अ) विसर्ग संधी (ब) स्वर संधी (क) व्यंजन संधी (ड) हल संधी

**प्रश्न क्र.23)** 'यशोधन' या शब्दाचा संधी प्रकार ओळखा.

(अ) स्वर संधी (ब) व्यंजन संधी (क) विसर्ग संधी (ड) पुर्वरुप संधी

**प्रश्न क्र.24)** चांगले खेळाडू आजकाल घडत नाहीत, अधोरेखित नामाचा प्रकार ओळखा.

(अ) धातुसाधित नाम (ब) भाववाचक नाम (क) सामान्य नाम (ड) सर्वनाम

**प्रश्न क्र.25)** भाववाचक नामांचा शब्दगट ओळखा.

(a) देवपण, प्रामाणिकपणा, मोठेपणा
(b) गरिबी, गोडी, लबाडी
(c) प्रौढत्व, मित्रत्व, शत्रुत्व
(d) गांभीर्य, धैर्य, माधुर्य

(अ) फक्त (a) व (c) बरोबर (ब) फक्त (b) व (d) बरोबर

(क) फक्त (b), (c), (d) बरोबर (ड) सर्व पर्याय बरोबर आहे.

**प्रश्न क्र.26)** 'साखळी हिसकावुन पळालेले चोर पोलीसांनी तासाभरात पकडले' या वाक्यातील प्रयोग ओळखा?

(अ) भावे प्रयोग (ब) कर्मणी प्रयोग (क) कर्तरी प्रयोग (ड) कर्तृ-कर्म संकर

**प्रश्न क्र.27)** दिलेल्या वाक्यातील प्रयोगाचा प्रकार ओळखा.
'तिचे गाणे गाऊन झाले'

(अ) समापन कर्मणी (ब) नवीन कर्मणी (क) शक्य कर्मणी (ड) पुरुष कर्मणी

**प्रश्न क्र.28)** 'मेघासम तो श्याम सावळा' या वाक्यातील अलंकार ओळखा.

(अ) रुपक (ब) उपमा (क) श्लेष (ड) यमक

**प्रश्न क्र.29)** 'अडकित्ता' हा शब्द कोणत्या भाषेतुन मराठीत आला.

(अ) हिंदी (ब) फारशी (क) कानडी (ड) पोर्तुगीज

**प्रश्न क्र.30)** पुढील उदाहरणात योग्य विरामचिन्ह द्या.

(अ) मी वाट पाहिली पण तो आला नाही. (ब) मी वाट पाहिली ; पण तो आला नाही.

(क) मी वाट पाहिली. पण, तो आला नाही. (ड) मी वाट पाहिली पण! तो आला नाही.

**प्रश्न क्र.31)** शुद्धलेखनदृष्ट्या अचूक शब्द ओळखा.

(अ) प्रतीकुल (ब) प्रतीकूल (क) प्रतिकूल (ड) प्रतिकुल

**प्रश्न क्र.32)** दिलेल्या म्हणीचा अर्थ निवडा.

'साखरेचे खाणार त्याला देव देणार'

(अ) गोड खाल्ले, की देव भरपुर देतो (ब) देवाने दिले तर गोड खावे.

(क) जो चांगली इच्छा करतो, त्याला चांगला लाभ होतो. (ड) जशी इच्छा तसे फळ मिळत नाही.

**प्रश्न क्र.33)** 'राईचा पर्वत करणे' खालील दिलेल्या पर्यायापैकी योग्य पर्याय निवडा.

(अ) खूप कष्ट करुन यश मिळविणे.

(ब) परिस्थिती नसताना एखादी गोष्ट साध्य करुन दाखविणे.

(क) एखादी गोष्ट क्षुल्लक असताना विपर्यास करुन सांगणे.

(ड) एखादी गोष्ट पुनरावृत्ती करुन सांगणे.

**प्रश्न क्र.34)** खाली दिलेल्या शब्दांमधील शुध्द शब्दांचा पर्याय निवडा.

(1) आशीर्वाद, क्षितीज (2)आशिर्वाद, क्षितिज

(3) क्षितिज, आशीर्वाद (4) आर्शीवाद, क्षितिज

**पर्याय -** (अ) फक्त 1 बरोबर (ब) फक्त 3 बरोबर

(क) 1 आणि 3 बरोबर (ड) फक्त 4 बरोबर

**प्रश्न क्र.35)** 'जीव टांगणीला लागणे' या वाक्यप्रचाराचा अर्थ शोधा.

(अ) जीवावर उदार होणे (ब) उतावीळ होणे

(क) खूप कष्ट करणे (ड) चिंताग्रस्त होणे

**प्रश्न क्र.36)** 'तत्परता' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द ओळखा.

(अ) कुचराई (ब) लगबग

(क) ताबडतोब (ड) तात्पुरता

**प्रश्न क्र.37)** खालील विरुद्धार्थी शब्दांच्या जोड्या जुळवा.

| | |
|---|---|
| (अ) आगंतुक | (1) विद्यमान |
| (ब) अतिवृष्टी | (2) कर्णकटू |
| (क) माजी | (3) अनावृष्टी |
| (ड) कर्णमधुर | (4) आमंत्रित |

**पर्याय -**

| | अ | ब | क | ड | | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (अ) | 2 | 1 | 4 | 3 | (ब) | 4 | 3 | 2 | 1 |
| (क) | 3 | 4 | 2 | 1 | (ड) | 4 | 3 | 1 | 2 |

**प्रश्न क्र.38)** पुढील वाक्यातील क्रियाविशेषणाचा प्रकार ओळखा.

<u>मोठ्याने</u> ओरडू नकोस

(अ) नामसाधित क्रियाविशेषण अव्यय (ब) विशेषणसाधित क्रियाविशेषण अव्यय

(क) धातुसाधित क्रियाविशेषण अव्यय (ड) अव्ययसाधित क्रियाविशेषण अव्यय

**प्रश्न क्र.39)** खालील शब्दांतील 'घर'या अर्थाशी समानार्थी नसलेला शब्द कोणता?

1) निकेतन 2) सदन 3) वदन 4) भवन

**पर्याय -** (अ) 1, 2, 3 बरोबर, 4 चुक (ब) 2, 3, 4 बरोबर, 1चुक

(क) 1, 3, 4 बरोबर, 2 चुक (ड) यापैकी एकही पर्याय योग्य नाही.

**प्रश्न क्र.40)** 'चक्रपाणि, लक्ष्मीकांत, नीलकंठ' ही कोणत्या समासाची उदाहरणे आहेत.

(अ) अव्ययीभाव (ब) बहुव्रीही (क) द्वंद्व (ड) तत्पुरुष

**प्रश्न क्र.41)** 'येथे असा काय प्रकार घडला, की तो मला माहीत नाही' हे वाक्य कोणत्या प्रकाराचे आहे ?

(अ) गौण वाक्य (ब) संयुक्त वाक्य (क) मिश्र वाक्य (ड) केवल वाक्य

**प्रश्न क्र.42)** खालील पैकी नपुसकलिंगी असलेला शब्द कोणता?

(अ) सूर्य (ब) रात्र

(क) फडके (ड) पगडी

**प्रश्न क्र.43)** योग्य जोड्या लावा.

अ) गणनावाचक संख्या विशेषण 1) एकेक मुलगा
ब) क्रमवाचक संख्या विशेषण 2) चौपट मुले
क) आवृत्तीवाचक संख्या विशेषण 3) दहा मुली
ड) पृथकत्ववाचक संख्या विशेषण 4) पहिला वर्ग

**पर्याय -**

| | अ | ब | क | ड | | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (अ) | 3 | 4 | 2 | 1 | (ब) | 4 | 2 | 3 | 1 |
| (क) | 3 | 1 | 4 | 2 | (ड) | 4 | 3 | 1 | 2 |

**प्रश्न क्र.44)** व्यंजनास --------- असेही म्हणतात?

(अ) उष्मे (ब) परवर्ण (क) मृदू स्वर (ड) स्वरादी

**प्रश्न क्र.45)** 'विर भोग्या वसुंधरा' हे ब्रीदवाक्य खालीलपैकी कोणाचे ?

(अ) दहशतवाद विरोधी पथक (ATS) (ब) फोर्स वन

(क) राज्य गुप्तवार्ता विभाग (SID) (ड) सी-60 (C-60)

**प्रश्न क्र.46)** महाराष्ट्र पोलीस स्थापना दिवस खालीलपैकी कोणत्या दिवशी साजरा केला जातो ?

(अ) 02 जून (ब) 12 जानेवारी (क) 02 जानेवारी (ड) 21 ऑक्टोबर

**प्रश्न क्र.47)** **CCTNS** म्हणजे काय ?

(अ) Crime And Criminal Tracking Network and Systems

(ब) Crime Control Traffic Network System

(क) Crime And Criminal Traffic Network and Systems

(ड) Crime Control And Tracking Network System

**प्रश्न क्र.48)** भारतीय न्याय संहिता (BNS) 2023 हा कायदा कोणत्या दिनांकास लागू झाला ?

(अ) 1 जुलै 2023 (ब) 1 जुलै 2024 (क) 1 जानेवारी 2023 (ड) 1 जानेवारी 2024

**प्रश्न क्र.49)** राज्यसभेच्या उमेदवारांना किमान वयोमर्यादा किती आहे ?

(अ) 25 वर्षे (ब) 30 वर्षे (क) 35 वर्षे (ड) 21 वर्षे

**प्रश्न क्र.50)** राष्ट्रीय मतदार दिवस दरवर्षी ..... या दिवशी साजरा केला जातो.

(अ) 25 जानेवारी (ब) 26 जानेवारी (क) 26 नोव्हेंबर (ड) 1 जानेवारी

**प्रश्न क्र.51)** देशातील वृद्धांसाठीचा अर्थसंकल्प सादर करणारे पहिले राज्य कोणते आहे ?

(अ) महाराष्ट्र (ब) हरियाणा (क) पंजाब (ड) केरळ

**प्रश्न क्र.52)** भारतातील पहिली **AI** तंत्रज्ञान आधारीत अंगणवाडी कोणत्या जिल्हयात सुरु करण्यात आली ?

(अ) अमरावती (ब) पुणे (क) नागपूर (ड) सिंधुदुर्ग

**प्रश्न क्र.53)** पंतप्रधान कार्यालयाचे नवीन नाव काय ठेवण्यात आले आहे ?

(अ) लोकभवन (ब) कर्तव्यभवन (क) सेवा सदन (ड) सेवा तीर्थ

**प्रश्न क्र.54)** 'एक देश, एक निवडणूक' या समितीचे अध्यक्ष कोण होते ?

(अ) अमित शहा (ब) नरेंद्र मोदी (क) सुरेश प्रभू (ड) रामनाथ कोविंद

**प्रश्न क्र.55)** भारत सेवक समाज कोणी स्थापन केला ?

(अ) गो.ग. आगरकर (ब) लोकमान्य टिळक

(क) गोपाळकृष्ण गोखले (ड) राजा राममोहन रॉय

**प्रश्न क्र.56)** कर्झन वायली यास ---- यांनी गोळी घालून ठार केले.

(अ) अनंत कान्हेरे (ब) मदनलाल धिंग्रा

(क) खुदीराम बोस (ड) दामोदर चाफेकर

**प्रश्न क्र.57)** चौरीचौरा घटनेने कोणते आंदोलन संपुष्टात आले ?

(अ) रौलट विरोधी सत्याग्रह (ब) भारत छोडो

(क) असहकार आंदोलन (ड) सविनय कायदेभंग

**प्रश्न क्र.58)** '1857 चे स्वातंत्र्यसमर' हे पुस्तक कोणी लिहीले ?

(अ) न्या. म. गो. रानडे (ब) गो. कृ. गोखले

(क) लोकमान्य टिळक (ड) वि. दा. सावरकर

**प्रश्न क्र.59)** पुणे करारावर यापैकी कोणी स्वाक्षरी केली ?

(अ) गोखले व डॉ. आंबेडकर (ब) टिळक व डॉ. आंबेडकर

(क) रानडे व डॉ. आंबेडकर (ड) गांधीजी व डॉ. आंबेडकर

**प्रश्न क्र.60)** खालीलपैकी जीवाणूजन्य रोग कोणता आहे ?

(अ) देवी (ब) रेबीज क) पटकी (ड) गोवर

**प्रश्न क्र.61)** प्रोपेनचे रासायनिक सुत्र कोणते आहे ?

(अ) $C_2 H_4$ (ब) $C_3 H_8$ क) $C_4 H_{10}$ (ड) यापैकी नाही.

**प्रश्न क्र.62)** एक न्युटन = किती डाइन ?

(अ) $10^3$ (ब) $10^5$ क) $10^7$ (ड) $10^9$

**प्रश्न क्र.63)** खालीलपैकी कोणता पचनसंस्थेचा भाग नाही ?

(अ) जठर (ब) लहान आतडे क) यकृत (ड) फुफ्फुस

**प्रश्न क्र.64)** पोटॅशियमची रासायनिक संज्ञा कोणती ?

(अ) Po (ब) Pt क) P (ड) K

**प्रश्न क्र.65) ICC** पुरूष **T – 20** विश्वचषक 2026 स्पर्धेमध्ये एकूण किती संघांनी सहभाग नोंदवला ?

(अ) 16 (ब) 20 क) 18 (ड) 12

**प्रश्न क्र.66)** 2026 सालचा शांतता काळातील सर्वोच्च लष्करी सन्मान अशोक चक्र......यांना देण्यात आला ?

(अ) अर्शदीप सिंग (ब) डोलेश्वर सुब्बा
(क) प्रशांत बालकृष्णन नायर (ड) शुभांशू शुक्ला

**प्रश्न क्र.67)** इंडिया **AI** इम्पॅक्ट समीट 2026 कोणत्या शहरात पार पडली ?

(अ) नवी दिल्ली (ब) बेंगलोर क) हैद्राबाद (ड) मुंबई

**प्रश्न क्र.68)** प्रोजेक्ट चित्ता कोणत्या राष्ट्रीय उद्यानाशी संबंधीत आहे ?

(अ) कुनो (ब) बांधवगड क) जिम कॉर्बेट (ड) काझीरंगा

**प्रश्न क्र.69)** जानेवारी 2026 मध्ये खालीलपैकी कोणासोबत भारताने मुक्त व्यापार करारावर स्वाक्षरी केली ?

(अ) जपान (ब) ऑस्ट्रेलिया क) युरोपियन युनियन (ड) ब्राझील

**प्रश्न क्र.70)** चाबहार बंदर कुठे आहे?

अ) इजिप्त ब) इराण क) पाकिस्तान (ड) मलेशिया

**प्रश्न क्र.71)** यापैकी सर्वात प्राचीन पर्वतरांग कोणती आहे?

अ) हिमालय ब) अरवली

क) सह्याद्री ड) बालाघाट

**प्रश्न क्र.72)** वर्धा आणि वैनगंगा नद्यांच्या संगमातून तयार होणारी नदी कोणती?

अ) इंद्रावती ब) प्राणहिता

क) भिमा ड) तापी

**प्रश्न क्र.73)** खालील पैकी कोणत्या गटात दिलेली सर्व राष्ट्रीय उद्याने महाराष्ट्रातील आहेत?

अ) कान्हा, ताडोबा, पेंच ब) ताडोबा, पेंच, नवेगाव, बोरीवली

क) ताडोबा, नवेगाव, बंदिपुर ड) ताडोबा, नवेगाव, बंदिपुर, शिवपुरी

**प्रश्न क्र.74)** बालाघाट जिल्हा गोंदिया जिल्ह्याच्या ------------दिशेस स्थित आहे.

अ) दक्षिण ब) पुर्व क) उत्तर ड) पश्चिम

**प्रश्न क्र.75)** गोंदिया जिल्ह्यास एकूण किती राज्यांच्या सिमा लागून आहेत?

अ) एक ब) दोन क) तीन ड) एकही नाही

**प्रश्न क्र. 76)** 2026 सालचा महाराष्ट्राचा अर्थसंकल्प ------------ यांनी मांडला.

अ) देवेंद्र फडणवीस ब) एकनाथ शिंदे

क) सुनेत्राताई पवार ड) जयंत पाटील

**प्रश्न क्र.77)** भारतीय अर्थशास्त्राचे जनक म्हणून कोणाला ओळखले जाते?

अ) राजा राममोहन रॉय ब) दादाभाई नौरोजी

क) अमर्त्य सेन ड) गोपाळ कृष्ण गोखले

**प्रश्न क्र.78)** जानेवारी 2026 मध्ये वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमची 56 वी वार्षीक बैठक --------- येथे झाली.

अ) पॅरीस ब) दावोस क) लंडन ड) न्यूयॉर्क

**प्रश्न क्र.79)** रिझर्व्ह बॅंक ऑफ इंडिया (RBI) चे मुख्यालय खालील पैकी कोणत्या शहरात आहे?

अ) दिल्ली ब)मुंबई क) कोलकाता ड) चेन्नई

**प्रश्न क्र.80)** खालील करापैकी कोणता कर प्रत्यक्ष कर नाही?

अ) आयकर ब) कार्पोरेट (निगम) कर क) विक्री कर ड) मालमत्ता कर

**प्रश्न क्र.81)** 7.25 मी. − 7 मी. 25 से.मी. + 4 मी. 1 से.मी. = ?

(अ) 0 मी. (ब) 4.01 मी. (क) 18.51 मी. (ड) 4.1 मी.

**प्रश्न क्र.82)** X व Y मिळून एक काम 15 दिवसात करतात. एकटा Y ते काम 25 दिवसात करतो तर एकटा X किती दिवसात काम पुर्ण करेल ?

(अ) $39\frac{1}{3}$ दिवस (ब) 38 दिवस (क) $37\frac{1}{2}$ दिवस. (ड) $36\frac{3}{4}$ दिवस

**प्रश्न क्र.83)** तीन पेट्यांमध्ये अनुक्रमे 216, 126 व 162 वह्या आहेत. त्या पेट्यांतील वह्यांचे समान वह्या असलेले गठ्ठे करायचे असल्यास प्रत्येक गठ्ठ्यात जास्तीत जास्त किती वह्या द्याव्यात ?

(अ) 6 (ब) 9 (क) 36 (ड) 18

**प्रश्न क्र.84)** जर 2 x 8 = 20, 3 x 9 = 31 आणि 5 x 8 = 44, तर 30 x 5 = ?

(अ) 150 (ब) 154 (क) 158 (ड) 145

**प्रश्न क्र.85)** एका क्रिकेट मॅचमध्ये अजयने घेतलेल्या विकेटची संख्या अमरने घेतलेल्या विकेट्सच्या संख्येच्या दुप्पटीपेक्षा 3 ने कमी आहे. त्यांनी घेतलेल्या विकेट्सच्या संख्येचा गुणाकार 20 असल्यास प्रत्येकाने घेतलेल्या विकेट्सची संख्या शोधा.

(अ) अमर = 2, अजय = 10 (ब) अमर = 4, अजय = 5

(क) अमर = 10, अजय = 2 (ड) अमर = 5, अजय = 4

**प्रश्न क्र.86)** 7 क्रमवार सम संख्यांची सरासरी 146 आहे. तर त्यांच्यापैकी सर्वात मोठी संख्या कोणती ?

(अ) 146 (ब) 140 (क) 150 (ड) 152

**प्रश्न क्र.87)** एका गाडीने ताशी 40 कि.मी. वेगाने पहिला अर्धा प्रवास पुर्ण केला व ताशी 60 कि.मी. वेगाने दुसरा अर्धा प्रवास पुर्ण केला तर त्या गाडीचा सरासरी वेग किती होता ?

(अ) ताशी 48 कि.मी. (ब) ताशी 50 कि.मी. (क) ताशी 54 कि.मी. (ड) ताशी 60 कि.मी.

**प्रश्न क्र.88)** **A** हा **B** च्या दुप्पट वेगाने काम करतो. जर **B** हा 50 दिवसात काम पुर्ण करतो तर **A** व **B** मिळून ते काम किती दिवसात संपवतील ?

(अ) 20 (ब) 15 (क) $16\frac{2}{3}$ (ड) $18\frac{1}{3}$

**प्रश्न क्र.89)** **A** आणि **B** यांच्या वयाचे गुणोत्तर 2:5 आहे. त्यांच्या वयाची बेरीज 63 असल्यास **A** चे वय काय ?

(अ) 21 (ब) 16 (क) 18 (ड) 27

**प्रश्न क्र.90)** एका घडाळयाच्या किंमतीत 20% कपात केली व नंतर काही दिवसांनी किंमतीत 10% वाढ केली, तर मुळच्या किंमतीत किती % फरक पडेल ?

(अ) 12% वाढ (ब) 12% घट (क) 8% वाढ (ड) 8% घट

**प्रश्न क्र.91)** रीताने व्याजाच्या दराइतक्या वर्षासाठी सरळ व्याजाने 1200/- रुपयाचे कर्ज घेतले, जर तीने कर्ज फेडतांना 432/- रुपये व्याज दिले असेल तर व्याजाचा दर किती होता ?

(अ) 5 (ब) 6 (क) 10 (ड) 12.50

**प्रश्न क्र.92)** जर $\sqrt{x+\sqrt{40+\sqrt{68+\sqrt{169}}}} = 11$ तर

X ची किंमत काढा.

(अ) 114 (ब) 121 (क) 128 (ड) 155

**प्रश्न क्र.93)** $40 \times 5 \div 8 + 162 \times 7 \div 18 - 65 \times 7 \div 13 = ?$

(अ) 53 (ब) 123 (क) 45 (ड) 63

**प्रश्न क्र.94)** 287.813 या संख्येस १० च्या घातांक पदावलीत लिहा.

(अ) $2 \times 10^2 + 8 \times 10^1 + 7 \times 10^0 - 8 \times 10^{-1} + 1 \times 10^{-2} + 3 \times 10^{-3}$

(ब) $2 \times 10^2 + 8 \times 10^1 + 7 \times 10^0 - 8 \times 10^{-1} + 1 \times 10^{-2} + 3 \times 10^{3}$

(क) $2 \times 10^2 + 8 \times 10^1 + 7 \times 10^0 + 8 \times 10^{-1} + 1 \times 10^{-2} + 3 \times 10^{3}$

(ड) $2 \times 10^2 + 8 \times 10^1 + 7 \times 10^0 + 8 \times 10^{-1} + 1 \times 10^{-2} + 3 \times 10^{-3}$

**प्रश्न क्र.95)** $\frac{57.33}{63} = 0.91$ तर $\frac{5.733}{9.1} =$ ?

(अ) 63 (ब) 0.63 (क) 6.3 (ड) 0.063

**प्रश्न क्र.96)** 792*9 या संख्येस 11 ने निःशेष भाग जातो तर * च्या जागी कोणता अंक असावा ?

(अ) 8 (ब) 2 (क) 7 (ड) 9

**प्रश्न क्र.97)** एका पिशवीमध्ये 130 नाणी (coins) असुन एकुण 450 रुपये आहेत. त्या पिशवीमध्ये काही 1 रुपयाची व काही 5 रुपयाची नाणी आहेत; तर 1 रुपयाची एकुण नाणी किती ?

(अ) 50 (ब) 60 (क) 70 (ड) 80

**प्रश्न क्र.98)** 200 मीटर लांबीच्या ट्रेनला 72 कि.मी. प्रती तास वेगाने 360 मीटर लांबीचा बोगदा पुर्णपणे ओलांडण्याकरीता किती वेळ लागेल ?

(अ) 28 सेकंद (ब) 30 सेकंद (क) 1 मिनिट (ड) 38 सेकंद

**प्रश्न क्र.99)** एका कारमधील 6 लोकांचे सरासरी वजन 35 किलो होते. रमेश कारमध्ये बसल्यानंतर सरासरी 1 ने वाढली, तर रमेशचे वजन किती ?

(अ) 41 (ब) 45 (क) 43 (ड) 42

**प्रश्न क्र.100)** एका चौरसाकृती मैदानाची प्रत्येक बाजु 120 मीटर आहे. त्या मैदानाभोवती 5 फेरा मारल्यास किती अंतर कापले जाईल ?

(अ) 2.1 कि.मी. (ब) 2.4 कि.मी. (क) 480 मीटर (ड) 600 मीटर

## कच्च्या कामाकरिता

B